# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
## (शिक्षण विभाग)

क्रमांक :११९१/शि.वि. दिनांक 23/10/2013

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
..............सर्व.............................. प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा. नागपूर

**विषय :– शालेय पोषण आहार योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना 1) एन्टरल फीड पावडर झेन्प्रो–डी.एस. पुरविण्याबाबत.**

**संदर्भ :– अ) मा. शिक्षण संचालक प्राथ. शिक्षण संचालनालय पुणे यांचे पत्र क्र.प्राशिस/शापोआ/डी. बॅनर/306/2013/4792 दि. 10/10/2013.**

**अ)** उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुशंगाने **शालेय** पोशण आहार योजने **अंतर्गत** विद्यार्थ्यांना झेन्प्रो–डी–**एस.** पावडर वाटप करावयाचे शासनाचे निर्देश आहेत. तरी खालील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे आपले शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात यावेत. सदर प्रोटीन फूड (Enteral Feed Power) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत पात्र प्राथमिक गटातील इयत्ता 1 ते 5 च्या विद्यार्थ्यांना दयावयाचे आहे.

अ) 1) झेन्प्रो–डी–एस. पावडर 5 ग्रॅम दुधामध्ये, किंवा स्वच्छ पाण्यामध्ये आठवडयातून दोन वेळा घेणे.
2) एका विद्यार्थ्यांना 5ग्रॅमचा डोस आठवडयातून दोनदा असा चार आठवडे देण्यात यावा.
3) सदर प्रोटीन फूड (Enteral Feed Power) विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या उपस्थितीतच दयावयाचे आहे.
4) सदर सदर प्रोटीन फूड (Enteral Feed Power) 126 ग्रॅम सॅचेट मध्ये उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना 5 ग्रॅम प्रमाणे पावडर देतांना काही प्रमाणत पावडर सॅचेट व्यवस्थित न लावल्यास पावडरवर परिणाम होण्याची /जंतूसंसर्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी शिल्लक पावडरचे सॅचेट व्यवस्थित लावल्या जाईल याची दक्षता घेण्याबाबत सूचना मुख्याध्यापकांनी वर्गशिक्षकांना देण्यात याव्यात.
5) पुरविण्यात आलेले प्रोटीन फूड (Enteral Feed Power) पावडर वापरण्याबाबत सदरचे पावडर कसे वापरावे याची माहितीपुस्तिका प्रत्येक बॉक्स सोबत पुरविण्यात आलेली आहे. माहिती पुस्तिकाप्रमाणे पावडरचा वापर करावा.
6) प्रोटीन फूड (Enteral Feed Power) पावडर स्वीकारतांना ती मुदतबाहय नाही याची खात्री करावी.
7) प्रोटीन फूड (Enteral Feed Power) पावडर वाटप करण्याआधी जवळपासच्या वैद्यकीय डॉक्टरांचा सल्ल्यानुसार वाटप करणे आवश्यक आहे.

उपरोक्त योजनेच्या साहित्याचे वाटप दुर्गानगर माध्यमिक शाळा, नविन सुभेदार येथे दि. 28/10/2013 रोजी 11:00 ते 3:00 यावेळात वाटप करण्यात येईल. संबंधित मुख्याध्यापकांनी नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

**प्रतिलीपी :–**

1) मा. उपायुक्त म.न.पा. यांच्या माहीतीस्तव सादर.
2) मा. उपसंचालक आरोग्य म.न.पा. नागपूर.